# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५०/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. जुड रिबेलो**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ प्र) शहर,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर-२ यांचे कार्यालय,
महापालिका नवीन बिल्डिंग, भगवान वाल्मिकी चौक, हुनमान मंदिरासमोर,
विद्यांलकार मार्ग, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व) मुंबई -३७

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर-२ यांचे कार्यालय,
महापालिका नवीन बिल्डिंग, भगवान वाल्मिकी चौक, हुनमान मंदिरासमोर,
विद्यांलकार मार्ग, अॅन्टॉप हिल, वडाळा (पूर्व) मुंबई -३७

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १७.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १५.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ.नों. क्र. ४३८६/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १८२२/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १६.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) आर/मध्य, बृहन्मुंबई महानगरपालिका, बोरीवली (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०३.०२.२०२० व दि.०४.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) आर/ मध्य विभाग यांनी त्यांचा अहवाल दि. २९.१२.२०२० आयोगासमोर सादर केला.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) आर/ मध्य विभाग यांनी त्यांचा अहवाल दि. २९.१२.२०२० मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे:-

*"मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त महोदय यांचेकडे दि. १५.०१.२०२० रोजी सुनावणी झाली. सदर दिवशी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत दि. १७.०१.२०२० अन्वये इमारत प्रस्ताव*

..२/-

*विभागाकडे माहिती मिळविण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. तथापि, सदरची माहिती प्राप्त न झाल्याने दि.२८.१२.२०२० रोजी प्रत्यक्षात या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी इमारत प्रस्ताव विभागामध्ये जाऊन सदर बाबतीत उपलब्ध असणारी माहिती मिळविली व त्याच्या छायांकित प्रती अपिलकर्ता, श्री. जुड रिबेलो यांना दि. २९.१२.२०२० रोजी या कार्यालयाचे पत्र क्र. स.आ./आर-मध्य/११९०५/ई.व का. अन्वये विनामुल्य जलदगती पोस्टाने पाठविण्यात आलेल्या आहेत. तथापि, आपल्या कार्यालयाकडून या कार्यालयास केलेल्या दि. ०४.१२.२०२० च्या अनुषंगाने अपिलकर्त्यास दिलेल्या माहितीच्या प्रतींची छायांकित प्रती आपणांस सुद्धा देण्यासाठी सोबत जोडलेल्या आहेत."*

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**<u>तक्रार अर्ज निकाली</u> काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२५**